# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, इगतपुरी,

## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:** igatpuri.amfu@gmail.com

**<u>७१) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०३.११.२०२०</u>**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (२८/१०/२०२० ते ०२/११/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०४/११/२०२० ते ०८/११/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२७** | **२८** | **२९** | **३०** | **३१** | **०१** | **०२** | **दिनांक** | **०४** | **०५** | **०६** | **०७** | **०८** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३२.२ | ३२.० | ३१.५ | ३२.२ | ३१.० | ३१.० | ३१.४ | **कमाल तापमान (अं.से.)** | ३३ | ३३ | ३३ | ३२ | ३३ |
| १७.६ | १७.६ | १५.५ | १४.६ | १४.५ | १७.० | १९.५ | **किमान तापमान (अं.से.)** | १६ | १६ | १५ | १५ | १५ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | **ढग स्थिती (आकाश)** | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र |
| ६६ | ८० | ८५ | ७४ | ६८ | ७१ | ८६ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)** | ५४ | ४९ | ४७ | ४७ | ४७ |
| ४३ | ३४ | ३५ | ३९ | ३७ | ४८ | ३८ | **दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)** | ३० | २८ | २३ | २३ | २५ |
| ३.६ | ३.० | २.७ | २.३ | २.८ | २.६ | ४.१ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ६ | ५ | ६ | ८ | ७ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| **पीक** | **अवस्था** | **कृषि विषयक सल्ला** |
|---|---|---|
| हवामान सारांश | | **पुढील पाच दिवस आकाश निरभ्र राहील तसेच पुढे पाच दिवस हवामान अंदाजानुसार पाऊस पडण्याची शक्यता नाही.** |
| सामान्य सल्ला | | १. शेतीचे कामे करताना कामगाराना ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल. शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत. तोंडाला मास्क अथवा कापड गुडाळावे.<br>२. पावसाचा अंदाज घेवुनच पिकावर कीटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी. |
| संदेश | | -- |
| भात | परिपक्वता अवस्था- लोंबी परिपक्वता | १) हवामानातील पावसाच्या भाकितानुसार, भात पिकाची काढणी सुरु करावी. पीक परिपक्व अवस्थतेत असेल तेथे खाचरात वाहणारे पाणी बंद करावे किंवा जास्तीचे पाणी बाहेर काढावे. पावसापासून वाचविण्यासाठी या अगोदरच कापणी करण्यात आलेल्या पिकाचे ढीग वाळविणे तसेच मळणीसाठी सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करावे.<br>२) भात पिकामध्ये आभाळमय काजळी व उद्बत्ताग्रस्त लोब्यांचा नायनाट करावा. |
| नाचणी | परिपक्वता- लोंबी परिपक्वता | १) पक्व नाचणी पिकांची काढणी करून घ्यावी आणि तयार शेती माल सुरक्षित शेडमध्ये किंवा उन पडलेले असताना उन्हामध्ये वाळवावा व नंतर सुरक्षित ठिकाणी ठेवावा.<br>२) पक्व नाचणी पिक पावसामुळे शेतात पडलेले असल्यास तयार नाचणी लोंब्या गोळा कराव्यात. गोळा केलेल्या लोंब्या सुरक्षित शेडमध्ये अथवा उन्हामध्ये सुकवाव्यात व त्यानंतर मळणी करून तयार शेतीमाल कोरड्या व सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| कापूस | परिपक्वता अवस्था - बोंडे वाढीची ते उमलण्याची | १) पहिली वेचणी १५ ते २५ % बोंडे फुटल्यानंतर व पावसाची उघडीप असल्यासच करावी. दुसरी व तीसरी वेचणी १० ते १५ दिवसांच्या अंतराने पहिली वेचणी झाल्यानंतर करावी.<br>२) कापूस वेचणी आटोपल्यानांतर सर्व प-हाट्या उपटून शेताबाहेर न्याव्यात व त्याचे कंपोष्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा. जेणेकरून किडीची सुप्त अवस्था नष्ट होतील. |
| रब्बी ज्वारी | | खोडकिडीच्या नियंत्रणासाठी १५ मिली क्विनोलफॉस २५ ई.सी. या कीटकनाशकाची प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| गहू | | बागायती गहू पिकाची नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. हेक्टरी २० ते २२ लाख झाडांची संख्या राखण्यासाठी १०० ते १२५ किग्रॅ बियाणे वापरावे बागायती पेरणीसाठी दोन ओळींतील अंतर २० सेमी व खोली ५ ते ६ सेमी ठेवावी. उशिरा पेरणीसाठी हेक्टरी १२५ ते १५० किग्रॅ बियाणे वापरावे व दोन ओळींतील अंतर १८ सेमी राखून पेरणी करावी. पेरणीपूर्वी एक किग्रॅ बियाण्यास ३ ग्रॅम थायरम ७५ % डब्लू एस + २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धन गुळाच्या थंड द्रावणाद्वारे चोळून बीजप्रक्रिया करावी.<br>बागायती वेळेवर पेरणीसाठी - फुले समाधान, त्र्यंबक, तपोवन, एमएसीएस ६२२२<br>बागायती उशिरा पेरणीसाठी - फुले समाधान, एनआयएडब्लू ३४, एकेएडब्लू ४६२७<br>मर्यादित सिंचनासाठी- नेत्रावती, फुले सात्विक, नेत्रावती<br>बागायती पेरणीच्या वेळेस रासायनिक खते ६०:६०:४० नत्र:स्फुरद:पालाश किग्रॅ/हेक्टरी तसेच बागायती उशिरा पेरणीसाठी ४५:६०:४० नत्र:स्फुरद:पालाश किग्रॅ/हेक्टरी द्यावे. |
| हरभरा | | बागायती हरभरा पिकाची पेरणी २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर दरम्यान करावी. पेरणीकरिता देशी वाण विजय,विशाल, दिग्विजय आणि फुले विक्रम तसेच काबुली वाण विराट, पीकेव्ही-२, पीकेव्ही-४ वापरावेत. पेरणीपूर्वी एक किग्रॅ बियाण्यास २ ग्रॅम बाविस्टीन + २ ग्रॅम थायरम आणि २५ ग्रॅम रायझोबियम जीवाणू संवर्धन गुळाच्या थंड द्रावणाद्वारे चोळून बीजप्रक्रिया करावी |
| सिताफळ | | पिठ्या ढेकणाचा प्रादुर्भाव दिसून येताच ४०० ग्रॅम व्हर्टीसिलीअम लेकॅनी + १ लीटर दूध १०० लीटर पाण्यात मिसळून संध्याकाळी फवारणी करावी. |
| लिंबूवर्गीय फळपिके | | फायटोपथोरा या बुरशीच्या नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा जैविक बुरशी २५ ग्रॅम प्रती झाड या प्रमाणात शेणखतामध्ये मिसळून वापरावी. मोसंबी पिकामध्ये फळ काढणीपुर्वी येणारे देठ कुज या रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेडाझिम १ ग्रॅम प्रती लीटर या प्रमाणात घेऊन त्वरीत फवारणी करावी. |

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

ठिकाण : विकृसंके, इगतपुरी

दिनांक : ०३.११.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**

**तथा सहयोगी संशोधन संचालक,**

**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**